# जिप्सी' सिनेमाच्या खास प्रदर्शनाला  प्रेक्षकांचा हाऊसफुल्ल प्रतिसाद

लोकमत



महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांनी राष्ट्रीय पुरस्कार विजेता बालकलाकार कबीर खंदारे याचा सन्मान केला. सोबत दिग्दर्शक शशी खंदारे.

## 'जिप्सी'च्या विशेष खेळाला प्रेक्षकांचा हाउसफुल्ल प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळातर्फे पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे शशी खंदारे दिग्दर्शित 'जिप्सी' सिनेमाचा विशेष खेळ दाखविण्यात आला. वंचितांचे जगणे, त्यात आत्मजाणिवेने होणारे परिवर्तन यांची हृदयस्पर्शी आणि तितकीच प्रेरणादायी कहाणी असलेल्या 'जिप्सी'च्या खास प्रदर्शनाला प्रेक्षकांचा हाउसफुल्ल प्रतिसाद लाभला.

जुन्या चित्रपटांचे वैभव प्रेक्षकांना पुन्हा अनुभवता यावे आणि नव्या पिढीने तयार केलेले उत्तमोत्तम चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचावेत, हा दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळाचा उद्देश आहे. या उपक्रमाद्वारे दर महिन्याला किमान एक चित्रपट प्रेक्षकांना दाखवला जातो. 'कान', 'इफ्फी', राष्ट्रीय पुरस्कारांसह देश-विदेशांतील महोत्सव गाजविणाऱ्या 'जिप्सी'च्या प्रदर्शनप्रसंगी महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, चित्रपटाचे दिग्दर्शक शशी खंदारे, राष्ट्रीय पुरस्कार विजेता बालकलाकार कबीर खंदारे यांच्यासह चित्रपटाची संपूर्ण टीम उपस्थित होती.

चित्रपट प्रदर्शनानंतर कलाकारांची साजणीकर यांनी मुलाखत घेतली. चित्रपट निर्मितीतील गमतीदार किस्से आणि राष्ट्रीय पुरस्कारापर्यंतचा प्रवास आदी गोष्टी मुलाखतीतून उलगडण्यात आल्या. आपल्या मातीतील ही सिनेकथा एका लहानग्याच्या आत्मशोधाचा पट मांडत अंतर्मुख करते.

Hello Mumbai
Page No. 3    Nov 18, 2025
Powered by: erelego.com

## 'जिप्सी' चित्रपटाच्या खास प्रदर्शनाला प्रेक्षकांचा हाऊसफुल्ल प्रतिसाद

### सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांनी घेतली विशेष मुलाखत



**मुंबई** : वंचितांचं जगणं आणि त्यात आत्मजाणिवेनं होणारं परिवर्तन यांची हृदयस्पर्शी आणि तितकीच प्रेरणादायी कहाणी असलेल्या 'जिप्सी' या चित्रपटाच्या खास प्रदर्शनाला प्रेक्षकांचा हाऊसफुल्ल प्रतिसाद लाभला.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या दादासाहेब फाळके चित्रपट 'रसास्वाद मंडळा' तर्फे 'पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी' येथे रविवारी दुपारी शशि खंदारे दिग्दर्शित 'जिप्सी' चित्रपटाचा खेळ आयोजित करण्यात आला होता. यावेळी महामंडळाचे सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, चित्रपटाचे दिग्दर्शक शशी खंदारे, राष्ट्रीय पुरस्कार विजेता बालकलाकार कबीर खंदारे यांच्यासह जिप्सी चित्रपटाची संपूर्ण टीम उपस्थित होती.

चित्रपट प्रदर्शनानंतर चित्रपटातील कलाकारांची साजणीकर यांनी मुलाखत घेतली, चित्रपट निर्मितीच्या प्रवासातील गमतीदार किस्से आणि राष्ट्रीय पुरस्कारापर्यंतचा प्रवास आदी गोष्टी मुलाखतीतून उलगडण्यात आल्या.



## 'जिप्सी'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

वंचित समाजाच्या वास्तव जीवनातील संघर्ष, आत्मजाणीव आणि परिवर्तनाचा प्रवास मांडणाऱ्या 'जिप्सी' या चित्रपटाच्या खास प्रदर्शनाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळातर्फे, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे हा विशेष खेळ आयोजित केला होता. कार्यक्रमात महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, चित्रपटाचे दिग्दर्शक शशि खंदारे, राष्ट्रीय पुरस्कार विजेता बालकलाकार कबीर खंदारेसह संपूर्ण टीम उपस्थित होती. प्रदर्शनानंतर प्रशांत साजणीकर यांनी कलाकार व तांत्रिक टीमची मुलाखत घेतली. या संवादात चित्रपटाच्या निर्मितीमागील अनुभव, चित्रीकरणातील अडचणी, तसेच राष्ट्रीय पुरस्कारापर्यंतचा प्रवास यांचा रोचक आढावा उपस्थितांसमोर आला. दर्जेदार, विचारप्रवर्तक आणि अर्थपूर्ण सिनेमाला पुन्हा एकदा आवश्यक ते व्यासपीठ मिळत असल्याचे या कार्यक्रमातून अधोरेखित झाले.

# जिप्सीचे खास प्रदर्शन हाऊसफुल्ल



वंचितांचं जगणं आणि त्यात आत्मजाणिवेनं होणारं परिवर्तन यांची हृदयस्पर्शी आणि तितकीच प्रेरणादायी कहाणी असलेल्या 'जिप्सी' या सिनेमाच्या खास प्रदर्शनाला प्रेक्षकांचा हाऊसफुल्ल प्रतिसाद लाभला. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळातर्फे पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे रविवारी दुपारी शशि खंदारे दिग्दर्शित जिप्सी सिनेमाचा खेळ आयोजित करण्यात आला होता. यावेळी महामंडळाचे सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, चित्रपटाचे दिग्दर्शक शशि खंदारे, राष्ट्रीय पुरस्कार विजेता बालकलाकार कबीर खंदारे यांच्यासह जिप्सी चित्रपटाची संपूर्ण टीम उपस्थित होती. चित्रपट प्रदर्शनानंतर चित्रपटातील कलाकारांची साजणीकर यांनी मुलाखत घेतली, चित्रपट निर्मितीच्या प्रवासातील गमतीदार किस्से आणि राष्ट्रीय पुरस्कारापर्यंतचा प्रवास आदी गोष्टी मुलाखतीतून उलगडण्यात आल्या.

महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. जुन्या चित्रपटांचे वैभव प्रेक्षकांना पुन्हा एकदा अनुभवता यावे आणि नव्या पिढीने तयार केलेले उत्तमोत्तम चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचावेत हा या मंडळाचा उद्देश आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून दर महिन्याला किमान एक चित्रपट प्रेक्षकांना दाखवला जातो.